

आषाढी एकादशीनिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा!

एन.सी.आय.बी.नवी दिल्ली शाखा -लातूर (महाराष्ट्र)



गुरू पोर्णिमेनिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

एन.सी.आय.बी.नवी दिल्ली शाखा -लातूर (महाराष्ट्र)

# खबर

से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK

मुख्य संपादक
शिरीषकुमार तुकाराम शेरखाने
मो.९०४९८४४४१२

कार्यकारी संपादक
ॲड.चंद्रशेखर धोत्रे, मुंबई

website : https://khabarsehakikattak.in
Email : shirishkumarsherkhane@gmail.com

RNI No. : MAHMAR/2023/86200



लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनानिमित्त

विनम्र अभिवादन!

एन.सी.आय.बी.नवी दिल्ली शाखा -लातूर (महाराष्ट्र)

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष : २ रे. | अंक : ०६ वा. | सोमवार दि. १५ ते २१ जुलै २०२४ | पाने : ४ | किंमत : २ रू.


# मराठवाड्यात गोरे हॉस्पिटल नावाजले; मूकबधिराच्या शस्त्रक्रियेने गाजले

लातूर(प्रतिनिधी): लातूर(प्रतिनिधी): भारतात जन्माला येणाऱ्या कर्णबधिर मुलांपैकी ९०% टक्के मुलं ही जन्मभर कर्णबधिरच राहतात. या मुलांचे शिक्षण व भविष्यातील व्यावसायिक कौशल्य या सर्वांवरच खूप परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार भारतात सहा कोटी तीस लाख लोक कर्णदोषाने बाधित आहेत. थोडक्यात म्हणजे प्रत्येक एक हजार लोकसंख्येमागे चार बालके जन्मजात कर्णबधिर जन्माला येत आहेत. वीस वर्षापर्यंत भारतात या लोकांसाठी आपल्याकडे फारसे उपाय वैद्यकशास्त्रात नव्हते. पण आता कॉक्लियर इम्पप्लांट सारख्या शस्त्रक्रियेमुळे हे शक्य झाले आहे.



शस्त्रक्रिया पार पाडताना सर्व डॉक्टर व स्टाफ.



यशस्वी शस्त्रक्रिया पार पाडल्यानंतर सर्व डॉक्टर व स्टाफच्या चेहऱ्यावरील आनंद.

एखादी व्यक्ती मुल कसे ऐकते, हवेतील आवाज, ध्वनीलहरी,जे कानावाटे मधल्या कोक्लिअरवर पडतात. तेव्हा तेथील ऐकण्याची नस या लहरींना इलेक्ट्रिक सिग्नल्स मध्ये रूपांतरित करते आणि मेंदूतील ऐकण्याच्या केंद्रापर्यंत पोहोचवते. तेथून मेंदूतील बोलण्याचे (वाचा) केंद्र उत्तेजित होते व माणसाला ऐकलेल्या दोन्ही लहरींना शब्दांमध्ये समजणे सोपे जाते. याचाच अर्थ एखाद्या व्यक्तीला मुलाला बोलता येण्यासाठी ऐकण्याची क्षमता जन्मतः चांगली कार्यरत असणे आवश्यक असते. बाळ जन्मताना त्याचे वजन खूप कमी असणे, जन्मजात कावीळ लवकर बरी न होणे, जन्मतः बाळाला काचेच्या पेटीत ठेवण्याची वेळ आल्यास या रुग्णांमध्ये दहा ते वीस टक्क्यांनी कर्णबधिर असण्याची शक्यता वाढते. पहिल्या तीन वर्षांमध्ये मेंदूज्वर झाल्यास कर्णबधिरपणा येऊ शकतो.

आईमध्ये ही जागृती असणे आवश्यक आहे की, हा आजार कुठल्याही मुलाला होऊ शकतो. पहिल्या तीन महिन्यांमध्ये बाळ डोळे फिरवणे, मान फिरवणे, असा प्रतिसाद देते. सहा महिने ते एक वर्षाचे मुल आवाजाने आईच्या बोलण्याला प्रतिसाद द्यायला लागते. एक वर्षानंतर ते मुल



**ग्राऊंड रिपोर्ट**
**शिरीषकुमार शेरखाने**
एनसीआयबी अधिकारी

बाबा, मामा, असे शब्द उच्चाराय ला लागते. तसे विचारल्यास कान,नाक, डोळे, असे अवयव दाखवायला शिकते. यापैकी कशातही ते मुल बसत नसेल तर वेळीच पालकांनी कान नाक घसा तज्ञाकडे सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. कॉक्लियर इम्प्लांटनावाचे एक यंत्र कानाच्या आत शस्त्रक्रिया करून बसवले जाते. कानाच्या बाहेरून एक स्पीच प्रोसेसर बसवला जातो. ही शस्त्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित असून पूर्णपणे कर्णबधिर असलेल्यांच्या आयुष्यात एक आशेचा किरण म्हणून समजले जाते. जन्मतः कर्णबधिर मुलं किंवा मोठेपणी आलेल्या कर्णबधिरपणामध्ये ही शस्त्रक्रिया करता येते. या शस्त्रक्रियेनंतर स्पीच थेरपी घेणे अत्यावश्यक आहे. ही शस्त्रक्रिया कधीही करू

**'गोरे हॉस्पिटलची' इतिहासातील प्रथमच मोठी कामगिरी मुकबधीरांना आता ऐकायलाही येणार अन् बोलायलाही येणार**



हाच तो बालक आहे, ज्याच्यावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. सोबत डॉ.आनंद गोरे.

शकतो. बाळाचे वय तीन ते आठ वर्ष होण्याच्या आतही शस्त्रक्रिया झाल्यास ते बाळ इतर नॉर्मल बालकासारखे ऐकू व बोलू शकते. कॉक्लियर इम्प्लांटहे यंत्र आवाजाला मेंदूपर्यंत पोहोचवते. पण या आवाजाला शब्दाचे व भाषेचे स्वरूप मिळणे गरजेचे आहे. त्यासाठीच स्पीच थेरपी गरजेची आहे. परदेशात एक महिन्याच्या आत बाळाची कर्णदोष तपासणी व गरज असल्यास एक वर्षाच्या आत शस्त्रक्रिया करण्यासाठी कायदा आहे. भारत सरकार, खाजगी संस्था व अनेक जण भारतातही यासाठी मदत करतात. पी आर ओ ॲड.बसवेश्वर पसारे हे व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.शस्त्रक्रिया करत असताना रुग्णांचे पालक यांनी धैर्याने साथ दिली. रुग्णांच्या नातेवाईकानिही चांगली कामगिरी बजावली. या तीन वर्षाच्या लहान बाळावर झालेली यशस्वी शस्त्रक्रिया हा महाराष्ट्रभर कौतुकाचा आणि चर्चेचा विषय ठरला.

**यशस्वी शस्त्रक्रियेसाठी यांचे योगदान लाभले**

प्रोफेसर डॉ.हेतल पटेल मॅडम (हेड ऑफ द डिपार्टमेंट- इ. एन. टी; हेड, नेक, सर्जरी) के.ई.एम. हॉस्पिटल, मुंबई., डॉ.आनंद गोरे आणि डॉ. हर्षदा गोरे (डायरेक्टर्स गोरे इ.एन.टी.अँड डेंटल, हॉस्पिटल, लातूर.) डॉ.शशी पाटील (कन्सल्टंट अनेस्थिटीस्ट), लातूर डॉ.सपना अशोक डाके मॅडम (ऑडिओलॉजिस्ट अ‍ॅड स्पीच थेरापिस्ट) गोरे हॉस्पिटल स्टॉफ या सर्वांचे शस्त्रक्रियेसाठी मोलाचे सहकार्य लाभले.


साप्ताहिक खबर से हकीकत तक वृत्तपत्राच्या वर्धापन दिन अंकास हार्दिक शुभेच्छा!





## मोफत बसेसची आणि अल्पोपहाराची व्यवस्था

# द्वारकादास शामकुमारचा पंढरपूर आषाढी एकादशीनिमित्त वारकऱ्यांसाठी स्तुत्य उपक्रम



लातूर : गेल्या दहा वर्षांपासूनची परंपरा कायम ठेवत येथील द्वारकादास श्यामकुमार वस्त्रदालनाच्या वतीने मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, लातूर, उदगीर, अंबाजोगाई व अहमदपूर येथून आषाढीनिमित्त पंढरपूर वारीला जाण्यासाठी ३० बसेसची सोय करण्यात आली होती. या बसेसमधून १३५० वारकऱ्यांनी पंढरीची वारी केली. यावेळी या वारकऱ्यांसाठी अल्पोपहाराचीही सोय करण्यात आली होती.

१० वर्षे ही अविरत सेवा संचालक तुकाराम जाधव पाटील याच्या मार्गदर्शनाखाली द्वारकादास शामकुमार ग्रुपच्या वतीने केली जाते. प्रवासात वारकऱ्यांसाठी हरिपाठ संकीर्तन व्यवस्था देखील करण्यात आली होती. याप्रसंगी द्वारकादास शामकुमार ग्रुपचे राजू पाटील यांनी वारकरी प्रवाशांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास दशरथ पाटील, ॲड. दासराव शिरुरे, डॉ. राम बोरगावकर, वनिता काळे, सुजित बिरादार, अमोल चामे, माधव जाधव, आसिफ शेख, प्रमोद भोयरेकर, कैलास मंत्री, तुकाराम शिंदे, उपप्राचार्य नागरगोजे, उपप्राचार्य माळी, मुकेश राजेमाने, संभाजी नवघरे, सुदाम पवार, राजू पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## एनसीआयबी अधिकारी मनीषा जोंधळे यांनी जनतेला दिला संदेश

# सीएमई विद्यालयात वृक्षारोपन कार्यक्रम






नाशिक/जिल्हा प्रतिनिधी: आषाढी एकादशी निमित्त विद्यालयात वृक्षारोपण करून झाडे लावा झाडे जगवा चा दिला संदेश शैक्षणिक क्षेत्रात कर्तव्य बजावत असताना सामाजिक कार्य तितकेच महत्त्वाचे असे समजून बालकाला आणि समाजाला एक नवी दिशा देणारे NCIB च्या अधिकारी मनीषा जोंधळे यांनी महाराष्ट्राची संस्कृती जपत आषाढी एकादशी निमित्त पांजरापोळ येथील CME शाळेने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेऊन झाडे लावा, झाडे जगवा, हा संदेश दिला. याप्रसंगी सायली जोंधळे, राजेश गोसावी, समीक्षा भालेराव, पूजा वानखेडे, कविता गुरव, सीमा दानी, सुगंधा अहिरे, आदी उपस्थित होते.

## संपादकीय....

# गुरूपोर्णिमा विशेष...!

**गुरु ब्रह्मा गुरु विष्णु गुरु देवो महेश्वरा**
**गुरु साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः**
**गुरुर ब्रह्मा गुरुर विष्णु, गुरुर देवो महेश्वरा**
**गुरु साक्षात् परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः**

गुरु पौर्णिमेचा शुभ दिवस, ज्याला व्यास पौर्णिमा किंवा व्यासपूजा असेही म्हणतात, हिंदू महिन्यात आषाढ किंवा आषाढ (जून आणि जुलै महिन्यांदरम्यान) घडते. हे वेद व्यासांच्या वाढदिवसाचे स्मरण देखील करते, ज्यांना पुराण, महाभारत आणि वेद यासारख्या सर्व काळातील काही सर्वात महत्वाचे हिंदू ग्रंथ लिहिण्याचे श्रेय दिले जाते. हा दिवस गुरु –संस्कृत शब्दाला समर्पित आहे ज्याचा अर्थ अंधार दूर करणारा आणि अज्ञान दूर करणारा आहे.

**खरे गुरु कोण?**

गुरू किंवा शिक्षक हे नेहमीच देवासारखे मानले गेले आहेत आणि सर्वांनी सर्वांनी आत्मज्ञानी आत्मा म्हणून स्वीकारले आहे.

गुरु गोविंद दोऊ उभे काके लागू , बलिहारी गुरु आपनो जिन गोविंद दियो
गुरु गोविंद दोघ खरे, काके लागुन पाये बलिहारी गुरु अपना, जिन गोविंद दीयो बताये

वरील ओळींचा अर्थ असा आहे की जेव्हा गुरु (शिक्षक) आणि गोविंद (सर्वशक्तिमान) दोघेही शिष्याच्या (विद्यार्थ्या) समोर उभे असतात, तेव्हा त्याने प्रथम कोणाच्या पायाला स्पर्श करावा? त्याला असे वाटते की तो प्रथम आपल्या गुरूंच्या चरणांना स्पर्श करेल कारण त्यानेच गोविंदांबद्दल शिष्याचे ज्ञान केले आणि त्याला सर्वशक्तिमानाकडे नेले. उल्लेख केल्याप्रमाणे गुरू हा अज्ञान आणि निरक्षरतेचा अंधार दूर करणारा आहे; जो शिष्याची बुद्धी, बुद्धी आणि जागरूकता जागृत करतो आणि त्याला आत्मज्ञानाकडे नेतो. गुरु धीर धरतात आणि आपल्या शिष्याला नियमित ध्यान, योग्य कृती, विचार आणि सत्य यावर लक्ष केंद्रित करणारी नैतिक आणि नैतिक जीवनशैली शिकवतात. आपण आपल्या आयुष्यात बरेच धडे शिकतो आणि जो कोणी वय, लिंग, जात, धर्म किंवा स्थिती विचारात न घेता अंतर्दृष्टी निर्माण करतो तो गुरु, गुरु असतो.

**गुरु पौर्णिमेची कथा**

हिंदू पौराणिक कथेनुसार, सुमारे १५,००० वर्षांपूर्वी हिमालयाच्या उंच प्रदेशात एक योगी प्रकट झाला. तो कोठून आला हे कोणालाच माहीत नव्हते पण प्रत्येकाला त्याची पवित्र उपस्थिती जाणवली आणि त्याच्याभोवती गोळा झाले. तो ध्यान करत होता, ना तो हलला ना तो बोलत होता. त्याच्या चेहऱ्यावर अधूनमधून येणारे आनंदाचे अश्रू त्याने दाखविले होते.

त्याची क्षमता पाहून सर्वजण मंत्रमुग्ध झाले. अखेरीस, त्यांच्यापैकी सात वगळता प्रत्येक दर्शक निघून गेला, जे थांबले. जेव्हा शेवटी त्याचे डोळे उघडले तेव्हा त्या सात जणांनी त्याला त्याचे मार्ग शिकवण्याची विनंती केली, तो काय अनुभवत होता ते अनुभवण्याची इच्छा होती. त्याने त्यांना काढून टाकले, परंतु त्यांनी धीर धरला. शेवटी, त्याने त्यांना एक साधी तयारीची पायरी दिली आणि पुन्हा डोळे मिटले. सात जण तयारी करू लागले. दिवस आठवडयांमध्ये, आठवडे महिन्यांत, महिने वर्षांमध्ये लोटले, पण योगींचे लक्ष आणखी चौऱ्यांशी वर्षे त्यांच्याकडे गेले नाही. दक्षिणायनाच्या आगमनाचे प्रतीक असलेल्या उन्हाळ्याच्या संक्रांतीच्या दिवशी जागृत झाल्यावर , योगींना हे स्पष्ट झाले की ते सात चमकणारे ग्रह बनले आहेत, ज्ञानाची शिकवण प्राप्त करण्यास तयार आहेत. पुढच्या पौर्णिमेच्या दिवशी, तो शिक्षक म्हणून सात जणांना सामोरे गेला. अशा प्रकारे, आदियोगी – पहिले योगी आदिगुरू – पहिले शिक्षक झाले . आदि गुरू हे दुसरे कोणी नसून थोर व्यास होते आणि म्हणून त्यांना व्यास पौर्णिमा आणि व्यासपूजा ही नावे आली.

**गुरू शिष्य संबंध**

जीवनात काहीही शिकण्यासाठी आपल्याला एक शिक्षक/गुरू/गुरु हवा असतो जो आपल्याला मार्ग दाखवू शकतो. गुरू म्हणजे ज्ञानी आणि शिष्य म्हणजे प्रज्वलित करणारा दिवा. शिक्षकांच्या ज्ञानाशिवाय आणि शिकवणीशिवाय आपण जीवनातील बहुतेक गोष्टींबद्दल निराश होऊ शकतो. आपण आपल्या चुकांमुळे आणि आपल्या जगण्याच्या प्रवृत्तीने शिकतो परंतु शिक्षकाद्वारे शिकणे ही अधिक सखोल प्रक्रिया आहे, अधिक संरचित आहे. शिवाय, असे अनेक विषय आहेत जे शिक्षकांच्या मार्गदर्शनाशिवाय पूर्णपणे अनाकलनीय किंवा अवर्णनीय आहेत. गुरू शिष्यांना त्यांच्या आयुष्यभर गुरु/मार्गदर्शक म्हणून प्रोत्साहन आणि ज्ञान देऊन त्यांची क्षमता निर्माण करतो. जे लोक अध्यात्मिक मार्गावर आहेत त्यांच्यासाठी, गुरुपौर्णिमा हा वर्षातील सर्वात शुभ दिवस आहे कारण त्यांना मार्गावर असलेल्या आदि गुरुंची आणि इतर गुरुंची कृपा प्राप्त करायची आहे. गुरु पौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा हा दिवस साजरा करण्याचा, आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि आपल्या गुरुंना श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस आहे.

# माजी प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांना फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार प्रदान




लातूर : भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था आणि फुले आंबेडकर साहित्य पंचायत, सातारा यांच्या विद्यमाने दिला जाणारा यंदाचा (२०२३-२०२४) फुले आंबेडकर साहित्य पुरस्कार जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना देशातील ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या शुभ हस्ते देण्यात आला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार श्रीनाथ पाटील हे होते. प्रारंभी संस्थेचे कार्याध्यक्ष महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि माजी आमदार लक्ष्मण माने यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती दिली. याप्रसंगी बोलताना खासदार शरद पवार म्हणाले की, भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेने नेहमीच चांगल्या विचारांची पाठराखन केली आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांनी समाजासाठी आयुष्य वेचले. त्यांच्या विचारांमुळे समाजातील दुबळ्या घटकामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. पुढे बोलताना ते म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा वापर हा दीन, दलित व उपेक्षित वर्गासाठी केला. या राजाच नाव अजूनही सगळ्यांच्या तोंडातून निघते. यामुळे राज्यकर्त्यांनी सत्तेचा वापर लोकांच्या विकासासाठी केला पाहिजे. ज्यांनी समाजासाठी काहीतरी आगळं वेगळं काम केलं, सेवा केली, लिखाण केल अशा व्यक्तींची निवड करून त्यांचा सन्मान करण्याची आमच्या संस्थेची पद्धत आहे. या पुरस्कारामुळे साहित्यिकांना लिखाणाला अधिक बळ मिळेल आणि ते आपल्या साहित्याच्या क्षेत्रामध्ये आणखी वेगाने काम करतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार म्हणाले की, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी महाराष्ट्रातील आणि देशातील पुरोगामी चळवळींना वैचारिक आधार व बळ दिलेले आहे त्यांच्यामुळे महाराष्ट्राला पुरोगामी चेहरा प्राप्त झाला. ते सामाजिक क्रांतीचे जनक आहेत. त्यांनी हिंदू समाजाची कठोर चिकित्सा केली. त्यांनी देशातील पुरोहितशाहीला कडाडून विरोध केला कारण त्यांच्या मते पुरोहित शाही बहुजन समाजाला मानवी हक्क व स्वातंत्र्य या पासून वंचित ठेवते आणि बहुजन समाजावर मानसिक व बौद्धिक गुलामगिरी लादते. फुले-आंबेडकरांच्या तत्वज्ञानाच्या आधारेच बहुजन समाजाचा उद्धार होऊ शकतो. फुले-आंबेडकरांनी समता व स्वातंत्र्य या मूल्यांच्या आधारे भारतीय समाजाची पुनर्रचना करण्याचा आग्रह झाला धरला.

शेवटी ते म्हणाले की, खासदार शरद पवार साहेब देशातील प्रतिगामी शक्तीला रोखण्याचे काम करीत आहेत. अध्यक्षीय समारोप करताना माजी खासदार श्रीनिवास पाटील म्हणाले की, लक्ष्मण माने यांनी अत्यंत कष्टातून ही संस्था उभी केलेली आहे. या संस्थेच्या माध्यमातून मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाची नेहमीच दखल घेतली जाते. याप्रसंगी संघटनेचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित रामराजे आत्राम आणि युवा साहित्यिक पुरस्काराने सन्मानित विलास माने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ. मोहन देशमुख, गंगाधर जगमवाड, सौ प्रेमा कुंभार, नितीन कुंभार, प्रभाकर देशमुख, सुनील माने, शशी माने, शैलेंद्र माने, नारायण जावलीकर, मच्छिंद्रनाथ जाधव, हरिदास जाधव, संस्थेतील प्राध्यापक, शिक्षक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात पालखी सोहळा ; विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

लातूर : येथील साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील साने गुरुजी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात प्रती वर्षाप्रमाणे आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रुक्मिणी यांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडी सोहळा मध्ये विठ्ठल रुक्मिणीच्या पादुकासह विठ्ठल नामाचा गजर करत अध्यात्मिक व वृक्षांच्या दिंडीतून वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणत पर्यावरण जनजागृतीचा सुंदर मिलाप पहावयास मिळाला डोक्यावर टोपी अंगात सदरा व गळ्यात टाळ अशी विद्यार्थी तर डोक्यावर तुळशी वृंदावन, गळ्यात माळ व अंगावर नऊवारी साडी अशा विद्यार्थिनी मुखातून विठ्ठल नामाचा गजर करत वातावरण भक्तीमय करत होत्या.

तसेच पारंपरिक वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या टाळांचा, विण्याचा व मृदंगाचा आवाज परिसरात घुमत होता. संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते पालखीचे विधिवत



पूजन करून दिंडी मार्गस्थ करण्यात आली. दिंडी अवंती नगर, सोना नगर व कुलस्वामी नगर करत शाळेच्या परिसरात विसर्जित करण्यात आली. याप्रसंगी साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख व साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे, दोन्ही शाळांचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण’ योजनेमुळे महिला सशक्तीकरणास मिळणार चालना

राज्यातील महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी आणि त्यांच्या सशक्तीकरणास चालना देण्यासाठी राज्य शासनाने ‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण’ ही अतिशय महत्वपूर्ण योजना सुरु केली आहे. या योजनेमुळे राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील महिला, मुलींना दरमहा १ हजार ५०० रुपये म्हणजेच एका वर्षात १८ हजार रुपये लाभ दिला जाणार आहे. त्यामुळे या महिला आणि मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा होण्यासाठी मदत होणार आहे.



राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील आणि ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपर्यंत आहे, अशा सर्व महिला या याजानेसाठी पात्र आहे. एका कुटुंबात जास्तीत जास्त दोन महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. कुटुंबाच्या व्याख्याते पती, पत्नी व त्यांची अविवाहित मुले, मुली यांचा समावेश होतो. यामध्ये विवाहित, घटस्फोटीत, विधवा, परितक्त्या, निराधार, कुटुंबातील एक अविवाहित महिला यांचा समावेश आहे. या योजनेचा लाभ डीबीटी प्रणालीद्वारे लाभार्थी महिलेच्या आधार सलंग्न बँक खात्यामध्ये थेट दरमहा जमा केला जाणार असल्याने पात्र महिलांची ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक आहे.

ऑनलाईन नाव नोंदणीसाठी ‘नारीशक्ती दूत-Narishakti doot’ हे मोबाईल प कार्यान्वित करण्यात आले असून हे ॲप डाऊनलोड करून वैयक्तिक अर्जदार ऑनलाईन अर्ज भरू शकणार आहेत. ‘मुख्यमंत्री-लाडकी बहीण’ योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांना देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून योजनेची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. पर्यायी आणि सहज उपलब्ध होणारी कागदपत्रांच्या आधारे अर्ज भरून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत असली तरीही या कालावधीत केव्हाही अर्ज केला तरी पात्र महिलेला १ जुलै २०२४ पासून या याजानेचा लाभ दिला जाणार आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधाही निशुल्क असून या योजनेची अचूक माहिती लाभार्थ्यांना देण्यासाठी तालुकास्तरावर तहसील कार्यालय, पंचायत समिती, नगरपरिषद तथा नगरपंचायत याठिकाणी, तसेच जिल्हास्तरावर महिला व बालविकास अधिकारी कार्यालयात मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच १८१ या टोल फ्री क्रमांकावर किंवा ०२३८२-२९९६८० या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधून योजनेची अधिक माहिती प्राप्त करून घेता येणार आहे.

ऑफलाईन अर्जाचे नमुने निशुल्क स्वरुपात अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. शहरी व ग्रामीण भागात विशेष शिबिरांचे आयोजन केले जात असल्याने महिलांना आपल्या घराजवळच योजनेसाठी अर्ज करण्याची सुविधा मिळत आहे.

या शिबिरांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

तानाजी घोलप
प्र.जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

### प्रत्येक पात्र महिलेचा अर्ज भरून घेण्यासाठी शिबिरे

‘मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण’ योजनेसाठी जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांचे अर्ज भरून घेण्यासाठी प्रशासनामार्फत शहरी भागात विविध शिबिरे आयोजित करण्यात येत असून गाव पातळीवरही अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याद्वारे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यासाठी ग्रामीण भागात तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहायक, अंगणवाडी सेविका, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका यांच्यासह अन्य ग्रामस्तरीय कर्मचारी यांच्या समितीवर जबाबदारी देण्यात आली आहे. शहरी भागात अंगणवाडी सेविका, राष्ट्रीय नागरी जीवनोन्नती अभियानचे समूह संघटक, मदत कक्ष प्रमख व शहर मिशन व्यवस्थापक, आशा सेविका, सेतू सुविधा केंद्र व आपले सरकार सेवा केंद्र यांना पात्र महिलांचे अर्ज भरण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. महिलांचे ऑफलाईन अर्ज स्वीकारून ते पवर ऑनलाईन भरण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहणार आहे.

### योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधारकार्ड बंधनकारक असून आधारकार्डवरील माहिती प्रमाणेच अर्ज भरणे बंधनकारक आहे. यासोबतच अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म नोंदणी प्रमाणपत्र अथवा महिलेचे १५ वर्षांपूर्वीचे रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक दस्ताऐवज सोबत जोडावा. तसेच उत्पन्नाचा दाखला अथवा पिवळे किंवा केशरी रेशनकार्ड सोबत जोडावे. नवविवाहित महिलेच्या बाबतीत तिचे नाव रेशनकार्डवर लगेच लावणे शक्य होत नाही. त्यामुळे विवाह नोंदणी प्रमाणपत्र असलेल्या अशा नवविवाहित महिलेच्या पतीचे रेशनकार्ड हे उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. अर्जदाराचे विहित नमुन्यातील साध्या कागदावरील हमीपत्र, बँक पासबुक, अर्जदाराचा फोटो. आवश्यक आहे. महिलेचा जन्म परराज्यातील असल्यास पतीचे अधिवास प्रमाणपत्र, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, १५ वर्षांपूर्वीचे रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र यापैकी कोणताही एक दस्तऐवज ग्राह्य धरण्यात येणार आहे. तसेच या योजनेसाठी पोस्टातील बँक खातेही ग्राह्य मानले जाणार आहे.

# महात्मा बसवेश्वर वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम...

(पान ४ वरून) नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या परिपत्रकानुसार वरिष्ठ महाविद्यालयाच्या तासिका दि. १५ जुलै २०२४ पासून सुरू करण्याचे निर्देशाप्रमाणे आपण आज दि. १५ जुलै २०२४ पासून नियमितपणे प्रथम वर्ष तासिका सुरू केल्या आहेत. आपण मोठ्या संख्येने वर्गात उपस्थित राहून अध्ययन करावे असे सांगून त्यांनी सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन सुद्धा केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार नामदेव बेंदरगे यांनी मानले. यावेळी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयातील बीए, बीकॉम, बीएस्सी आणि बीएसडब्ल्यू प्रथम वर्षातील विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम बिरादार, अशोक शिंदे, अजय गायकवाड, बालाजी डावकरे आणि बालाजी होणराव यांनी परिश्रम घेतले.

# लातूर पोलिसांकडून सायबर-वाहतूक जनजागृती दिंडीचे आयोजन








लातूर : आषाढी एकादशीचे औचित्य साधून लातूर पोलीस दलाकडून सायबर-वाहतूक जनजागृती दिंडी चे दिनांक १६ जुलै रोजी लातूर शहरामध्ये आयोजन करण्यात आले. आजच्या काळात वाढती सायबर गुन्हेगारी चिंतेती बाब आहे. सर्वात धक्कादायक म्हणजे सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या आता विद्यार्थ्यांना आपल्या जाळ्यात अडकवतात. त्यामुळे विद्यार्थ्यां बरोबरच प्रौढ व्यक्तीमध्ये व समाजातील प्रत्येक घटकांमध्ये सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृती व्हावी, यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात सायबर सुरक्षेबाबत व वाहतुक नियम बाबत जनजागृती करिता आज दिनांक १६ जुलै २०२४ रोजी सकाळी दहा ते बारा वाजण्याच्या दरम्यान पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रांगणातून शाळकरी मुलांच्या साह्याने सायबर जनजागृती दिंडी काढून जनजागृती करण्यात आली.

सदर सायबर, वाहतुक नियम जनजागृती दिंडी कार्यक्रमात लातूर शहरातील ५ शाळेच्या ५०० विद्यार्थ्यांचा सहभाग असून यामध्ये सुशीलादेवी देशमुख मूकबधिर विद्यालय लातूर, ग्लोबल नॉलेज पब्लिक इंग्लिश स्कूल लातूर, सदानंद विद्यालय लातूर, देशीकेंद्र शाळा लातूर, शाहू कॉलेज आयटी डिपार्टमेंट च्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

लहान मुलांनी आपली सायबर सुरक्षा कशी करावी, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सायबर सुरक्षा संदर्भात माहिती व्हावी हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू असून सर्वांनी सायबर सुरक्षित राहणे आवश्यक आहे. असं यावेळी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितले ऑनलाईन गेमचं वाढलेला प्रमाण वाढले आहे.

लहान मुलं ऑनलाईन गेम खेळतात. त्या माध्यमातून माहिती गोळा केली जाते. डमी युजर्स क्रियेट केले जातात. ऑनलाईन मोबाईल खेळताना कोणती काळजी घेण्यात यावी, काय करावे आणि काय करू नये. यासंदर्भात पथनाट्य, बॅनर, फ्लेक्स च्या माध्यमाने समाजापर्यंत माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सायबर गुन्ह्याच्या पद्धत मध्ये एखादा युजर्स आठव्या वर्गात असेल.तर दुसरा मीही तुझ्याच वयाचा आहे. तुझे आई-वडील काय करतात. आर्थिक उत्पन्न काय आहे. तुमचे पालक परदेशात गेले होते का ? कार कोणती आहे, अशी माहिती गोळा करण्यात येते. व्हॉट्सअपवर नंबर शेअर होतात. समोरच्या व्यक्तीकडून संपूर्ण माहिती घेतात. यामुळे सायबर गुन्हेगारी करण्यास मदत होते. हळूहळू वैयक्तिक माहिती घेतात.

लहान मुलांना जाळ्यात ओढले जाते, असं पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सांगितलं. अशाप्रकारे सायबर गुन्ह्याचा विळखा समाजा भोवती आवळला जात आहे. यासंदर्भात जनजागृती करण्यासाठी सायबर दिंडीचे आयोजन करण्यात आले होते सदर सायबर दिंडी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा गणेश कदम ,पोलीस ठाणे शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर, भरोसा सेलचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक दयानंद पाटील, सायबर सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नलिनी गावडे, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, दंगा नियंत्रण पथक, शीघ्र कृती दल, भरोसा सेल, सायबर, वायरलेस, एटीबी पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदारांनी परिश्रम घेतले.

यावेळी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## गणेश सावळकर यांना महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार

लातूर - महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला लातूर येथील ज्येष्ठ विचारवंत सोमनाथ रोडे सर, साहित्यिक उचल्याकार लक्ष्मण गायकवाड महाराष्ट्र नसता निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष माधव बावगे सर, जिल्हाध्यक्ष अनिल दरेकर रुकसाना मुल्ला यांच्या हस्ते जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाके तांडा शाळेचे मुख्याध्यापक तथा उपक्रमशील शिक्षक गणेश सावळकर यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेताडा शाळेचे उपक्रमशील शिक्षक जाकीर शेख सर, फरदपूर शाळेचे सहशिक्षक संभाजी गुळवे, यांनाही हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी या पुरस्कार मिळाल्या बददल रेणापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, समाजाचे राज्यध्यक्ष ॲड.जांबुवंतराव सोनकवडे, जिल्हा अध्यक्ष श्रीमंत कावळे, केंद्रप्रमुख शिवाजी लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठली कटके हाके तांडा येथील शालेय समिती पदाधिकारी, ग्रामस्थ, यांनी अभिनंदन केले आहे.



ठाणे शहरातील वारली पाडा येथील वीरशैव ककया समाज मंडळाचे पदाधिकारी मारुती भालशंकर, संतोष साबणे व इतर पदाधिकारी यांनी लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.समाजाला महामंडळ घोषित केले बाबत ठाणे समाज बांधव पदाधिकारी यांचे खुप खुप धन्यवाद.



**अनंतदृष्टी ग्रुप मधील सदस्य श्रीमंत कावळे यांची रोटरी क्लब लातुर अध्यक्ष झाल्याबद्दल ग्रुपच्या वतीने सन्मानीत करण्यात आले**

## आषाढी एकादशीनिमित्त शारदाच्या चिमुकल्यांची निघाली दिंडी

लातूर : आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर येथील शारदा इंटरनॅशन स्कूलमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांची आषाढी दिंडी काढण्यात आली. भजन, अभंग, रिंगण असे अनेक उपक्रम घेण्यात आले. चिमुकल्यांनी विठुनामाचा जयघोष करीत त्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या दिंडीची सुरुवात विठ्ठल- रखुमाईच्या पूजेने करण्यात आली. यावेळी वारकरी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाई, संतांच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. चिमुकल्यांनी अभंगांवर ताल धरला. ही बाल दिंडी शारदा शाळेपासून व्यंकटेश मंदिरापर्यंत नेण्यात आली. 'विठ्ठल वारी', 'पालखी', वृंदावन, फुगडी, रिंगण हे प्रमुख आकर्षण होते. विद्यार्थिनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभागी झाल्या होत्या.

रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष एल. एम. पाटील यांनी कार्यक्रमाला संमती देऊन प्रोत्साहन दिले. शाळेचे प्राचार्य दत्ता धारगे, उपप्राचार्य विलास गायकवाड, उपप्राचार्या शीला शेळके, वैशाली गिरवलकर यांनी मार्गदर्शन केले.

## कॉक्सिटमध्ये बी.एस्सी.आर्टिफिशीयल इन्टीलिजंस अभ्यासक्रमाला मान्यता

लातूर : येथील कॉक्सिटमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (२०२४- २५) बी. एस्सी. अर्टिफिशीयल इन्टीलिजंस हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

हा अभ्यासक्रम शैक्षणिक-उद्योगातील अंतर भरुन काढण्यासाठी उपयुक्त असणार आहे. आजघडीला अर्टिफिशीयल इन्टीलिजंस (अक) मार्केटमधील हॉट केक आहे.

बदलत्या तंत्रज्ञानानुसार कॉक्सिटमध्ये नवनवीन तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिले जात आहेत. याचा विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळण्यास फायदा होणार आहे. या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यास शासनाने परवानगी दिली आहे.

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप यांनी केले आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्तीसाठी २५ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

लातूर : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत दरवर्षी इयत्ता दहावी, बारावी,पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करुन उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थी व विद्यार्थीनींना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी महामंडळामार्फत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

सन २०२३-२४ या वित्तीय आर्थिक वर्षामध्ये इयत्ता दहावी, बारावी,पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रथम ०३ ते ०५ विद्यार्थी व विद्यार्थीनींना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर शिष्यवृत्तीचे वितरण करण्यात येणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थी व विद्यार्थीनींनाकडून शिष्यवृत्ती मागणीचे अर्ज महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाच्या संकेतस्थळावर किंवा प्रत्यक्ष जिल्हा कार्यालयामध्ये शिष्यवृत्ती मागणी अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २५ जुले २०२४ आहे. या नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तरी लातूर जिल्ह्यातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींनी शिष्यवृत्ती अर्ज भरताना आवश्यक ती कागदपत्रे, गुणपत्रके व पुढील वर्गात प्रवेश घेतल्याच्या इतर पुराव्यासह अर्ज सादर करावेत, असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे लातूर जिल्हा व्यवस्थापक यांनी कळविले आहे.

## पळवून नेलेल्या ३ मुलींचा एएचटीयूकडून शोध आणि सुटका



लातूर : अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने (एएचटीयू) शोध मोहिम राबवून पळवून नेलेल्या ३ अल्पवयीन मुलींना पुणे, छत्रपती संभाजी नगर आणि लातूर ग्रामीण येथून ताब्यात घेऊन त्यांची सुटका केली. एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळून नेले बाबत दिनांक ७ फेब्रुवारी २०२३ रोजी किनगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेले बाबत दिनांक ०६ मार्च २०२४ रोजी किल्लारी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल होता. तसेच एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेले बाबत दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी विवेकानंद चौक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर दाखल गुन्ह्यांबाबत संबंधित पोलीस स्टेशन सोबतच एएचटीयू कडून समांतर तपास करण्यात येत होता. सदर पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलींबाबत तांत्रिक तपासाच्या साहाय्याने माहिती जमा करून एएचटीयू च्या पथकाने पुणे, छत्रपती संभाजी नगर आणि लातूर ग्रामीण येथे जाऊन तिन्ही अल्पवयीन मुलींना आरोपींसह ताब्यात घेऊन संबंधित पोलीस स्टेशनला हजर केले आहे. सदरची कारवाई श्री सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक, लातूर, श्री अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांचे मार्गदर्शनाखाली श्री दयानंद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री एस एस सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव, महिला अंमलदार यादव व गिरी मॅडम, चालक मनियार सर्वजण नेमणूक एएचटीयू यांच्या पथकाने केली आहे.

## ग्रंथपाल अमित म्हेत्रे यांना पीएचडी

लातूर : लातूर शहर महानगरपालिकेच्या श्री शिवछत्रपती ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून कार्यरत असणारे अमित म्हेत्रे यांना राजस्थानातील श्री जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालयाच्या वतीने पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे.



म्हेत्रे यांनी 'द रोल ऑफ डिस्ट्रिक्ट पब्लिक लायब्ररी असोसिएशन इन द डेव्हलपमेंट ऑफ पब्लिक लायब्ररी इन लातूर डिस्ट्रिक्ट' या विषयावर शोधनिबंध सादर केला होता. नांदेड विद्यापीठांतर्गत डॉ.गोविंद घोगरे तसेच दिल्ली विद्यापीठांतर्गत डॉ. उषा सिंग यांच्या मार्गदर्शनात म्हेत्रे यांनी प्रबंध सादर केला होता.अमित म्हेत्रे यांच्या यशात आई शकुंतला म्हेत्रे,वडील जिल्हा न्यायालयातील सेवानिवृत्त निबंधक प्रफुल्ल म्हेत्रे,पत्नी, भाऊ-बहीण यांचा वाटा आहे. पीएचडी प्राप्त झाल्याबद्दल मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे,उपायुक्त तसेच पालिकेतील सर्व विभाग प्रभू प्रमुखांनी म्हेत्रे यांचा सत्कार करून अभिनंदन केले आहे.

हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंटर्स, बी-२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतूप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक - शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200

# यशवंत नागरी बँकेचे चेअरमन सुहास पाचपुते यांच्या हस्ते एकादशीनिमित्त फराळाचे वाटप




लातूर : येथील यशवंत नागरी सहकारी बँकेच्या सर्व शाखांतर्फे बुधवारी आषाढी एकादशीनिमित्त विविध मंदिरामध्ये भाविक भक्तांना उपवासाचा फराळ वाटप करण्यात आला.

यावेळी बँकेच्या मुख्य शाखेकडून शामनगर मधील सिध्दीविनायक गणेश मंदिर व गजानन महाराज मंदिर, कव्हा रोड शाखेकडून श्री विश्वेश्वर मंदिर तसेच औसा शाखेकडून औसा येथील श्री वीर हनुमान मंदिर येथे हा फराळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी बँकेचे चेअरमन सुहास पाचपुते, व्हा.चेअरमन सुर्यभान पाटील, संचालक वसंतराव पाटील, राजकुमार जाधव, सुनील शिंदे, सुरेश राठोड, भालचंद्र कदम तसेच बँकेच्या सर्व शाखेतील कर्मचारी वृंद व पिग्मी एजंट उपस्थित होते.




चि.विरांश तेजश शेरखाने व नारायणा इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थीनी कु.श्रीशा तेजश शेरखाने या बाल चिमुकल्यांनी आषाढी एकादशीनिमित्त चि.विरांशने विठोबाच्या रूपात तर कु.श्रीशाने रूक्माईच्या रूपात या विठ्ठल-रूक्मीणीचे साक्षात दर्शन घडविले.

# महात्मा बसवेश्वर वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थी व पालकांचे उत्साहात स्वागत



लातूर महात्मा बसवेश्वर वरिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे बीए, बीकॉम, बीएस्सी आणि बीएसडब्ल्यू प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा तासिका प्रारंभ दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महात्मा बसवेश्वर वरिष्ठ महाविद्यालयातील बीए, बीकॉम, बीएस्सी आणि बीएसडब्ल्यू प्रथम वर्षातील विद्यार्थी व पालकांचे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पहार तर विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी दुग्धशास्त्र विभागप्रमुख डॉ. गुणवंत बिरादार, डॉ. अभयकुमार धाराशीवे आणि कार्यालयीन प्रमुख (पान २ वर)




# राजमाता जिजामाता शाळेत पांडूरंगाच्या वेशभुषेत संस्कृतीचे दर्शन



लातूर - शहरातील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडी सोहळा व पालखी सोहळा उत्साहात पार पडला. विद्यार्थी व शिक्षकांनी पारंपारिक वारकर्यांची वेशभूषा परिधान करून शाळेच्या परिसरातून आकर्षक फुलांनी सजवलेली पालखी मिरवणूक काढली. पालखीमध्ये विठ्ठल-रुक्मिणी व ज्ञानेश्वरी ठेवण्यात आली होती.

संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये व सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून वारकरी दिंडीस प्रारंभ झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण आयएफएस अधिकारी प्रतीक्षा नानासाहेब काळे यांची उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे व वैशाली केंद्रे, संस्थेच्या सदस्य स्वाती घुले, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे, पर्यवेक्षिका सुनीता जवळे उपस्थित होते.

पालखी मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषेत टाळ, विणा हाती घेतले होते तर विद्यार्थिनी डोक्यावर तुळस घेऊन सहभागी झाल्या होत्या. यावेळी 'विठ्ठल नामाच्या' व 'ज्ञानोबा माउली तुकाराम'च्या जयघोषात संकुलाचा परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी प्रतीक्षा काळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रतीक्षा काळे यांनी, कोणतीही परीक्षा अवघड नसते. दृढ निश्चय ठेवून परीक्षेला आत्मविश्वासाने सामारे जावे. जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यातून हमखास यश मिळते, असा यशाचा कानमंत्र त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पानगावात प्रति पंढरपूरच्या रुपात विठ्ठल रुक्माईचे हेमाडपंथी मंदिर

लातूर : मराठवाड्यातील प्रति पंढरपूर म्हणून लातूर जिल्ह्यातील पानगाव येथील विठ्ठल रुक्माई चे मंदिर ओळखले जाते दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त या परिसरात मोठ्या प्रमाणात वारकरी संप्रदाय भाविक दिंड्या घेऊन येतात. हजारो भाविक दर्शन घेतात. या मंदिरात दरवर्षी आजूबाजूच्या परिसरातील ४० ते ५० गावातील दिंड्या येतात.



दिंडीचे पूजन करतात तसेच वारकऱ्यांचा सत्कार करण्यात येतो. ज्याप्रमाणे पंढरपूरमध्ये विविध उपक्रम राबवले जातात वारकरी, भाविक, विविध प्रकारे पावले टाकत रिंगण घालतात, नाना तरहेचे खेळ खेळतात. रिंगण घालतात. विविध प्रकारचे दुकाने सजवतात. या निमित्ताने सामाजिक संस्था, विविध संघटना, विविध समित्या सर्वजण मिळून भाविकांसाठी फराळाची व्यवस्था केली जाते. मंदिरावरती आकर्षक असे विद्युत रोशनी करण्यात येते. आलेल्या वारकऱ्यासाठी मोफत आरोग्य सेवा दिली जाते. त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येतो. रक्तदान शिबिरे घेण्यात येतात. अशाप्रकारे या गावातील एकंदरीत वातावरण पंढरपूरमय होऊन जाते.

या गावातील सर्व प्रकारचे प्रतिष्ठित, सर्वसामान्य नागरिक, मोठ्या प्रमाणात सहभाग घेऊन उत्साहपूर्वक आषाढी एकादशी निमित्ताने व्यवस्था करून वारकरी आणि भाविक यांच्या सहभागी होऊन कार्यक्रम पार पाडतात हे विशेष वैशिष्ट्य मानले जाते. पानगावच्या आजूबाजूच्या परिसरातील खेड्यापाड्यातील सरपंच आणि त्यांचे सर्व सहकारी यांचा सहभाग असतो. महाराष्ट्रामध्ये पानगाव एक प्रति पंढरपूर म्हणून संबोधले जाते. विठ्ठल रुक्माई चे हेमाडपंथी मंदिरयासाठी महाराष्ट्र शासनाने सुधारनेच्या दृष्टीने लक्ष दिले पाहिजे असे नागरिकांतून आणि भाविकातून व्यक्त केले जाते.

# एसीबीच्या जाळ्यात अडकला कर्मचारी

उदगीर(प्रतिनिधी): तालुक्यातील तोगरी येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक विद्यालयाचा कर्मचारी ४०० रुपयांची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात आडकला आहे.

तक्रारदार यांची बहीण ही बारावीच्या शिक्षणासाठी सन २०१२- १३ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तोगरी, ता.उदगीर मध्ये शिक्षण घेत होती. सन २०१३ मध्ये तिचे लग्न झाल्यानंतर तेव्हापासून ती मालेवाडी ता. गंगाखेड जि.परभणी येथे सासरी राहण्यास आहे. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता तक्रारदार यांच्या बहिणीस तिचा शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक होता म्हणून तिचा शाळा सोडल्याचा दाखला मिळणे बाबतचा विनंती अर्ज तक्रारदार ( विद्यार्थिनीचा भाऊ) याने दि. ८ जुलै २०२४ रोजी शाळेतील कार्यालयात दिला होता. तक्रारदार यांनी दि. १२ जुलै २०२४ रोजी शाळेत जाऊन त्यांचे बहिणीचा शाळा सोडल्याचा दाखला कधी मिळेल असे विचारले असता आरोपी लोकसेवक जयप्रकाश बालाजी बिरादार रा. विकासनगर देगलूर रोड उदगीर याने ४०० रुपये घेऊन या व दाखला घेऊन जा असे सांगितले. यानंतर तक्रारदार यांनी त्यांच्या बहिणीच्या संमतीने लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे लेखी तक्रार दिली. त्यावरून सापळा कार्यवाही आयोजित करण्यात आली. शासकीय पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक जयप्रकाश बालाजी बिरादार यांनी तक्रारदार यांच्याकडे ४०० रूपयांच्या लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य करून लाचेची रक्कम पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तोगरी, ता. उदगीर, जि.लातूर येथील कार्यालयात शासकीय पंचासमक्ष स्वतः स्वीकारली आहे. आरोपी लोकसेवकास सापळा पथकाने लाचेच्या रकमेसह रांगेहात पकडले. आरोपीस ताब्यात घेतले असून देवणी पोलीस येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता तक्रारदार यांच्या बहिणीस तिचा शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक होता. यासाठी शाळेतील कर्मचाऱ्याकडे तक्रारदार भाऊ हा शाळा सोडल्याचा दाखला मागत होता त्यावेळी या कर्मचाऱ्याकडून ४०० रूपयांची लाच मागण्यात आली होती.**

# बिर्ला ओपन माईंड स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त सांस्कृतीचा वारसा जपत दिला अनोखा संदेश

लातूर येथील बिर्ला ओपन माईंड इंटरनॅशनल स्कूल मध्ये आषाढी एकादशी निमित्त आज दिनांक १६/७/२०२४ ला दिंडी काढली होती या माध्यमातून वारकरी सांप्रदायिक महोत्सवाचे महत्व विशद केले यावेळी शाळेतील प्राचार्य अनिल पॉल सर, शाळेतील उपप्राचार्य अजय शर्मा सर, आणि शाळेचे व्यवस्थापक वैजनाथ कदम सर यांच्या हस्ते विठ्ठलाची पूजा करून भक्तीमय भावाने दिंडीची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, संतांच्या आकर्षक वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले तर चिमुकले बालगोपालांनी विठ्ठल नामाचा जप करीत संपूर्ण परिसर भक्तिमय केला होता. महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा भाग असणारी आषाढी एकादशी सोहळा यंदा जल्लोषात व भक्तिमय वातावरणात साजरा केला जात आहे. तसेच पंढरपूर पायी जाण्याची परंपरा ही फार जुनी असून भक्तांची श्रद्धा या वारीशी जुळलेली आहे. शाळेतील सांस्कृतिक विभागाचे प्रमुख अक्षय बारस्कर सर आणि त्यांच्या सहकारी वर्गाने आपापल्या परिश्रमाने हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये शाळेतील शिक्षकांनी तसेच कर्मचाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले.

